ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय
से. २५, निगडी, पुणे-४११०४४.
जावक क्र. ३६७/९४/१०१८९

त्वरीत.

जाक्र/प्रा/प्राशि/मान्यता/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक- 12 OCT 1989

प्रति,

शिक्षणाधिकारी
[प्राथमिक विभाग]
जिल्हा परिषद, ..पुणे........

विषय – जून १९८७ पूर्वी जुन्या पध्दतीनुसार सुरु असलेल्या ~~अनधिकृत~~ खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत......

संदर्भ – शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीईएलएस १०८२/५८७५१/(७१२)..प्राशि ३ दिनांक १८ जुलै ८३ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबधीचे आपले कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घालतेल्या सर्व साधारण बंदीला अपवाद करुन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविल्या ठिकाणी व व माध्यमातून जून १९८३ पासून ~~इ. १ली ते~~ ~~सन ८७-८८ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह~~ प्राथमिक शाळा सुरु करण्यास खालील नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम. |
|---|---|---|---|
| ज्ञान प्रबोधिनी संस्था, पुणे | ज्ञानप्रबोधिनी-ची मराठी विद्यालय नवनगर प्राधिकरण | – | मराठी |

१] संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिजे.

२] संस्थेने शाळेसाठी शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथ. शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहीत केलेल्या अटींनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहीत केलेल्या नियमानुसार विहीत वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहीत केलेल्या दरानेच वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

.... २ ....

३] संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे [उदा. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इ. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

४] संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.

५] ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खालील नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेवून मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.............

[१] संबधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त, अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमांखाली नोंदली आहे.

[२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

[४] संबधित संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबीत नाही.

६] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

७] संस्थेने विहीत नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा. ]

८] शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १ ~~करिता~~.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. पु. वि. यांची सही आहे.

प्रत- प्रशासनाधिकारी /महानगरपालिका/~~नगरपालिका~~ शिक्षण मंडळ पिंपरी-चिंचवड जिल्हा ..पुणे १९.. यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत- मा. ~~[illegible]~~ सचिव ....ज्ञानप्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ३०
..........................................................

यांना माहितीसाठी अग्रेषित.